# सिंबायोसिस करंडक -२०२४
## (प्रथम सांघिक उत्तेजनार्थ पुरस्कार)

३१ जुलै २०२४ रोजी, सिंबायोसिस कला आणि वाणिज्य महाविद्यालय आयोजित महाराष्ट्रातील सर्वात प्रतिष्ठित आंतरमहाविद्यालय मराठी नाट्यवाचन स्पर्धेत कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिस महाविद्यालयातर्फे "रश्शीवाला" ही संहिता विद्यार्थ्यांनी सादर केली. यशराज कदम याने नाटकाचे दिग्दर्शन केले . महाविद्यालयातर्फे अवंती हरणे , अक्षदा गायकवाड, रवी लाड , भाग्यश्री जाटोल , यशराज कदम आणि ओमकार स्वामी यांनी यास्पर्धेत प्रथमच सहभाग घेतला. या स्पर्धेत **प्रथम सांघिक उत्तेजनार्थचे पारितोषिक** कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिस महाविद्यालयाला मिळाले . हा अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. सर्व प्राध्यापक , व व्यवस्थापकीय समिती सदस्य आणि संचालक डॉ. महेश ठाकूर यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले.




